नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम, १९७६

कलम २० खाली दि. २२.१०.१९९२ च्या विकल्पा-नुसार शासनाकडे भरणा करावयाची रक्कम.

Competent Authority, Inward No. 6916, Date 21 NOV 1997, D III/20, C.A.

महाराष्ट्र शासन,
गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्र. नाजक १०९६/[६३३६]/नाजकधा-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १७ नोव्हेंबर, १९९७.

वाचा :- शासन निर्णय, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, क्र. युएलसी १०९२/[५३१३]/नाजकधा-१, दि. २२.१०.१९९२

प्रस्तावना :-

नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम, १९७६ च्या कलम २० खाली दि. २२.८.१९८६ रोजी घोषित केलेल्या मार्गदर्शक तत्वांना दि. २२.१०.१९९२ रोजी शासनाने विकल्प जाहीर केला होता. सदरहू विकल्पानुसार जमीनधारकांना सूट दिलेल्या अतिरिक्त मोकळ्या जमिनीपैकी "अ" प्रभागाने व्यापलेल्या योजना म्हणजे जोईंट भूखंड, [illegible] हाऊस व एक खोलीच्या सदनिका राबवावयाची नसेल तर सूट दिलेल्या जमिनीपैकी ५०% जमिनीची बाजारभावाने होणाऱ्या किंमतीच्या ३०% रक्कम शासनाकडे भरणा करण्याच्या अटीवर व्यतिरिक्त "अ" प्रभाग म्हणजे ३०% क्षेत्रावर २५ चौ. मी. पर्यंत आणि ५०% क्षेत्रावर ५० चौ. मी. पर्यंत आणि २०% क्षेत्रावर ८० चौ. मी. पर्यंत बहुमजली सदनिका बांधण्याची सवलत देण्यात आली होती. सदर शासन निर्णयानुसार सूट दिलेल्या जमिनीपैकी ५०% जमिनीची प्रचलित बाजारभावाने होणाऱ्या किंमतीच्या ३०% रक्कम तीन महिन्यांच्या अवधीत एकरकमी शासनाकडे भरणा करावयाची होती.

सूट दिलेल्या जमिनीपैकी ५०% जमिनीची प्रचलित बाजारभावाने होणाऱ्या किंमतीच्या ३०% रक्कम प्रत्यक्षात अनेक प्रकरणात मोठी येत असल्यामुळे विकासकार यांनी सदरहू रक्कम हप्त्याने भरण्याची परवानगी देण्याची मागणी शासनाकडे केली होती. याबाबत शासनाने पुढील निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

१. दि. २२.१०.१९९२ च्या अगोदर योजना मंजूर झालेली असेल तर "अ" प्रभागाने व्यापलेल्या क्षेत्राच्या प्रचलित बाजारभावाने होणाऱ्या किंमतीच्या ३०% रक्कम आणि दि. २२.१०.१९९२ नंतर योजना मंजूर झालेली असेल तर सूट

Scanned with CamScanner

दिलेल्या क्षेत्रापैकी ५०% क्षेत्राची प्रचलित बाजारभावाने होणाऱ्या किंमतीच्या ३०% रक्कम दोन समान वार्षिक हप्त्यात भरणा करण्याची मुभा जमीनधारक/विकासकार यांना आहे.

२. दोन समान वार्षिक हप्त्यापैकी पहिल्या हप्त्याचा भरणा शासकीय कोषागारात केल्यानंतर रूपांतरीत "अ" प्रभागाने वापरलेल्या क्षेत्रावर बांधकाम सुरु करण्याच्या सूचना स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात याव्यात.

३. उर्वरित रक्कम शासकीय कोषागारात भरणा होईपर्यंत हमी म्हणून जमीनधारक/विकासकार यांनी उर्वरित रकमेची बँक गॅरंटी गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाकडे सादर करावी. उर्वरित रकमेचा भरणा केल्यानंतर, बँक गॅरंटी संबंधितांना परत करण्यात यावी.

४. जमीनधारक/विकासकार यांनी फरकाची रक्कम सवलतीच्या दराने भरणा करण्याची सवलत उपभोगल्यास त्यांच्याकडून दरसाल दर शेकडा १८% दराने व्याज वसूल करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार आणि नावाने,

[ एस.आर. दलवाई ]
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. राज्यपालांचे सचिव.
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३. मंत्री [नाजकधा.] यांचे खाजगी सचिव.
४. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
५. राज्यमंत्री [नाजकधा.] यांचे खाजगी सचिव.
अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर.
७. उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, उल्हासनगर, सांगली, कोल्हापूर, सोलापूर.
८. विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, नागपूर विभाग.
९. जिल्हाधिकारी, ठाणे, पुणे, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, नागपूर.
१०. सर्व अधिकारी व कार्यासने, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई.

२विशि.१-१९९७.

713 ४५९ (२३)



[९] सचिव, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई:३२,
[१०] सचिव, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई:३२,
[११] विकास आयुक्त, [उद्योग], उद्योग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई:३२,
[१२] मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई,
[१३] व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, पुणे,
[१४] व्यवस्थापकीय संचालक, विदर्भ विकास महामंडळ, नागपूर,
[१५] अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक,
[१६] उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, उल्हासनगर, सांगली, कोल्हापूर, व सोलापूर,
[१७] सर्व मंत्रालयीन विभाग,
[१८] सर्व अधिकारी व कार्यासने, गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई:३२,

.........

Scanned with CamScanner